महाराष्ट्र पोलीस
रक्षणाय खलनिग्रहणाय

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
जुना मुंबई पुणे रोड, आनंद कोळीवाडा मुंब्रा, ठाणे
पिन ४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२,२५४६८३१५
E-mail-cp.thane.mumbra@mahapolice.gov.in

प्रेसनोट

दिनांक ०४/०९/२०२५

'' घरफोडी चोरी करणारी महिला आरोपीस मुंब्रा पोलिसांकडुन अटक करुन, गुन्हयातील चोरी गेले ३५ तोळे सोन्याचे दागिने व २० हजार रुपये रोख रक्कम हस्तगत ''

दिनांक १५/०८/२०२५ रोजी महिला नामे श्रीमती हिना सज्जाद अली सुर्वे, वय ४६ वर्षे, धंदा-गृहीणी रा.ठि. नुर मेहल बि विंग, फ्लट नं २०३, बिलाल हॉस्पीटल समोर, मुंब्रा ता.जि. ठाणे हे त्याच्या राहत्या घरातून त्यांची आई राहात असलेल्या अरफात बिल्डींग, तन्वरनगर मुंब्रा ठाणे या ठिकाणी मुंब्रा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या राहत्या दरवाजाची कुलूपाची डुब्लीकेट चावी बनवून सुमारे **३५ तोळे सोन्याचे दागिने व २० हजार रू. रोख** रक्कम असा एकुण २४,४२,०००/- मुद्देमाल चोरी करून नेल्याने फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन मुंब्रा पोलिस स्टेशनला गुन्हा नोंद क्र. । १४४१/२०२५ भा.न्या.सं.कलम ३३१(३), ३३१ (४) ३०५ (अ) प्रमाणे दिनांक ३१/०८/२०२५ रोजी ०८.४२ वाजता गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

गुन्हयाचा प्रकार पाहत, सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहुन यातील अज्ञात आरोपी निष्पन्न करुन गेला मुददेमाल हस्तगत करणेकामी, सदर गुन्हयाचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/विनायक माने यांचेकडे देण्यात आला. गुन्हयातील फिर्यादी यांच्या घराचे दरवाजाचे कुलूप, दरवाजा, कडी कोयंडा, खिडकी असे कोणत्या प्रकारची तोडफोड झालेली नसतांना फिर्यादी यांच्या राहात्या घरातील बेडरुममधील कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी झाल्याचे निष्पन्न झाल्याने, फिर्यादी यांच्या आजुबाजूच्या नातेवाईकांकडे व इतर फिर्यादीच्या संपर्कात असलेल्या कोणीतरी व्यक्तीने गुन्हा केला असावा, असे संशय असल्याचे निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने मा. सहा. पोलीस आयुक्त, कळवा विभाग, ठाणे वा मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंब्रा पो.स्टे यांचे मार्गदर्शनाखाली सी.सी.टी.व्ही फुटेज या तांत्रीक तपासाचे आधारे, मोबाईल फोन व गोपनीय बातमीदार याच्याकरवी तपास पथकातील अधिकारी सपोनि/विनायक माने व तपास पथकातील अंमलदार व महिला अंमलदार यांचे समक्ष फिर्यादी यांच्या नातेवाईकांची कसुन चौकशी केली असता, सर्वतोपरी केलेल्या तपासात संशयीत महिला नामे **सानिया सारीक बेग, वय २९ वर्षे, धंदा-गृहीणी, रा.ठि. मिडलॅन्ड इन्क्लेव्ह बिल्डींग, रूम नं ६०५, सहावा माळा, कमल मेडीकल जवळ, सेक्टर १०, फेज-१, तळोजा नवी मुंबई** यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास केला असता, त्यांचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने **गुन्हा दाखल झाल्यानंतर ०८ तासाच्या आत महिला आरोपीस अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.** महिला आरोपी अटकेत असतांना निवेदन पंचनाम्याप्रमाणे **३५ तोळे सोने व २० हजार रू. रोख रक्कम** असा गुन्हयात चोरी गेलेला खालील मुददेमाल हस्तगत करुन सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

१) ३,५०,०००/- रू. किंमतीचे एक सोन्याचे मंगळसुत्र अं. ०५ तोळे वजनाचे जु.वा.किं.सु
२) ४,२०,००० /-रू. किंमतीचे लहान मोठे दोन सोन्याचे नेकलेस अं. ०६ तोळे वजनाचे जु.वा.कि.सु
३) १,७५,०००/- रू. किंचे कानातील एक जोड सोन्याचे वेल अं. २.५ तोळे वजनाची जु.वा.कु.सू
४) २,१०,०००/- रू. किंमतीचे सोन्याची दोन नग बांगडी अं ०३ तोळे वजनाची जु.वा.कि.सु.

५) १,०५,०००/- रू. किंमतीचे सोन्याची एक ब्रेसलेट अं १.५ तोळे वजनाची जु.वा.कि.सु.
६) ४,५५,०००/- रू. किं.चे सोन्याची ०५ चैन व पॅन्डल ०४ अं ६.५ तोळे वजनाची जु.वा.कि.सु.
७) १,०५,०००/- रू. किंमतीचे एक सोन्याची लहान हार एरींग अं १.५ तोळे वजनाची जु.वा.कि.सु.
८) ३५,०००/- रू. किं चे लहान मुलांची सोन्याची अंगुठी एकुण ९ नग अं ५ ग्रॅम वजनाची जु.वा.
९) १,७५,०००/- रू. किंमतीचे १० नग सोन्याची लेडीज अंगुठी अं २.५ तोळे वजनाची जु.वा.कि.सु.
१०) १,४७,०००/- रू. किंमतीचे ०६ नग सोन्याची जेन्स अंगुठी अं २.१ तोळे वजनाची जु.वा.कि.सु.
११) १,०५,०००/- रू किं.चे ०४ जोडी लहान मोठे सोन्याची टॉप्स अं १.५ तोळे वजनाची जु.वा.
१२) ७०,०००/- रू. कि.चे ०३ नग सोन्याची लहान मुलांचे कडा अं ०१ तोळे वजनाची जु.वा.कि.सु.
१३) ३५,०००/- किंमतीचे सोन्याची लहान मुलांची अं ०५ ग्रॅम वजनाची जु.वा.कि.सु.
१४) ३५,०००/- किं.चे सोन्याची कान चैन, ब्रेसलेट लहान मुलांचे ०५ ग्रॅम वजनाची जु.वा.कि.सु.
१५) २०,०००/- रू. रोख रक्कम त्यामध्ये ५०० रू दराच्या ४० नोटा भारतीय चलनातील नोटा.

२४,४२,०००/- एकुण किंमत सुमारे

नमुद कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त श्री ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) श्री विनायक देशमुख, पोलीस उप आयुक्त श्री सुभाष बुरसे, तसेच सहा. पोलिस आयुक्त सो, कळवा विभाग ,श्रीमती प्रिया डमाळे, तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री अनिल शिंदे, पोनि/नितीन पगार, पोनि/शरद कुंभार, पोनि/राजु पाचोरकर, यांच्या मार्गदर्शनाखली सपोनि/ विनायम माने, पोहवा/६५५६ वसावे, पोहवा/४२६ कांबळे, पोहवा/६९३३ गायकवाड, पोशि/७६४१ एडके, पोशि/१३९३ आव्हाड,पोशि/ २०३४ सपकाळे, पोशि/२७५६ पाटोळे, पोशि/४०१२ सुर्यवंशी, पोशि/३३९१ हारूगले, यांनी यशस्विरित्या पार पाडली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/विनायक माने हे करित आहेत.